जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारित धोरण

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन पूरकपत्र क्रमांक. जिपब- ४८१९/प्र.क्र.३७३/आस्था-१४
२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : २८ मे, २०१९

वाचा :

१. शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४, दिनांक २७.२.२०१७.
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४, दिनांक १५.४.२०१७.
३. शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४, दिनांक १७.५.२०१७.
४. शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४, दिनांक ३१.५.२०१७.
५. शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.२६६/आस्था-१४, दिनांक ३१.५.२०१७.
६. शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४, दिनांक ८.३.२०१९.

शासन पूरकपत्र :-

शासनाने संदर्भ क्रमांक १ वरील दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्यासंदर्भात धोरणात्मक निणर्य घेतला. या धोरणात्मक निर्णयास अनुसरुन संदर्भ क्रंमाक २ ते ४ व ६ वरील शुध्दीपत्रकान्वये तसेच संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयानूसार वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. त्यानूसार प्रथमच राज्यातील जिल्हा परिषद मधील सर्व शिक्षकांच्या सन २०१८ च्या अखेरीस बदल्या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात आल्या. तसेच कोकण विभागातील सर्व जिल्हा

परिषदेच्या शिक्षकांच्या बदल्या सन २०१९ पर्यत करण्यात आल्या आहेत. सदरच्या बदल्या हया मानवी हस्तक्षेपाशिवाय करण्यात आल्या.

यासंदर्भात न्यायालयात झालेल्या रिट याचिका, शिक्षकांच्या तक्रारी तसेच प्रशासनाच्या अडचणी विचारात घेता, त्यानूसार सदर शासन निर्णयात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील व्याख्यांमध्ये विशेष संवर्ग भाग -१ मध्ये (अं) हा भाग दाखल करण्यात येत आहे.

(अं) खालील आजाराने ज्या शिक्षकांचे जोडीदार व्याधीग्रस्त आहेत असे शिक्षक

१) ह्दय शस्त्रक्रिया झालेली आहे.

२) जन्मापासून एकच मुत्रपिंड (किडनी) असलेले/मुत्रपिंड रोपण केलेले कर्मचारी/डायलिसीस सुरु असलेले.

३)कॅन्सरने (कर्करोग) आजारी.

४) मेंदूचा आजार असलेले.

५) थॅलेसेमिया विकारग्रस्त मुलांचे पालक.

२) विशेष संवर्ग २ साठी पात्र असणारे शिक्षक हे दोन्ही एकाच जिल्हापरिषदेचे शिक्षक असल्यास-

अ) पती पत्नी या दोघांपैकी एकही शिक्षक बदलीपात्र शिक्षक नसल्यास अथवा दोघेही बदलीपात्र शिक्षक असल्यास ज्या शिक्षकाचा सेवाकालावधी तो कार्यरत असलेल्या शाळेत जास्त झाला असेल अशा शिक्षकानेच पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज करावा. पती पत्नी यांचा सेवा कालावधी सारखा असल्यास , त्या दोघांपैकी इच्छुक असेल अशा एकानेच बदली अर्ज सादर करावा.

ब) पती पत्नी या दोघांपैकी एकच शिक्षक बदलीपात्र असल्यास , जो शिक्षक बदलीपात्र आहे त्याच शिक्षकाने पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज करावा.

विशेष संवर्ग २ मधील पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत संबंधित शिक्षकांना लाभ मिळण्यासंदर्भात शासन प्रयत्नशील आहे . विशेष संवर्ग २ मधील शिक्षकांनी पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज केला असल्यास, त्यांना संगणकीय आज्ञावलीमार्फत शक्यतो ३०कि.मी.च्या आत बदली देण्याचा प्रयत्न असेल. तथापि ३०कि.मी.च्या आत बदली देणे शक्य नसल्यास, ३० कि.मी च्या आत असलेल्या लगतच्या ठिकाणी पदस्थापना देण्याचा अंतीम प्रयत्न मुख्य कार्यकारी अधिकारी टप्पा ३ व ४ च्या नंतर राबविण्यात येणाऱ्या समुपदेशनाच्या टप्प्यात करतील. त्यासाठी संबंधीत शिक्षकांनी संगणकीय प्रक्रीयेनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

३) दिनांक २७.२.२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र - ४ (विशेष संवर्ग शिक्षक भाग २) येथे अनुक्रमांक ११ असा वाचावा.

“ मी असे प्रमाणित करते /करतो की, मी व माझी पती /पत्नी दोघेही बदलीपात्र शिक्षक असून मी कार्यरत असलेल्या शाळेतील माझा सेवा कालावधी जास्त असल्याने मी पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज सादर करीत आहे. ”

अथवा

“ मी असे प्रमाणित करते /करतो की, मी व माझी पती /पत्नी दोघेही बदलीपात्र शिक्षक असून मी कार्यरत असलेल्या शाळेतील माझ्या पतीचा /पत्नीचा व माझा सध्या कार्यरत असलेल्या शाळेतील कालावधी सारखा असल्याने आम्हा दोघांच्या संमतीनुसार मी बदली अर्ज सादर करीत आहे. ”

अथवा

“ मी असे प्रमाणित करते /करतो की, मी व माझी पती /पत्नी दोघेही बदलीपात्र शिक्षक नसून मी कार्यरत असलेल्या शाळेतील माझा सेवा कालावधी जास्त असल्याने मी पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज सादर करीत आहे. ”

अथवा

" मी असे प्रमाणित करते /करतो की, मी व माझी पती /पत्नी दोघेही बदलीपात्र शिक्षक नसून मी कार्यरत असलेल्या शाळेतील माझ्या पतीचा /पत्नीचा व माझा सध्या कार्यरत असलेल्या शाळेतील कालावधी सारखा असल्याने आम्हा दोघांच्या संमतीनुसार मी बदली अर्ज सादर करीत आहे. "

अथवा

" मी असे प्रमाणित करते /करतो की, मी व माझी पती /पत्नी आम्हा दोघांपैकी फक्त मी बदलीपात्र शिक्षक असून मी पती पत्नी एकत्रीकरणाअंतर्गत अर्ज सादर करीत आहे. "

४) शासन निर्णयाचा टप्पा क्र- ५ संदर्भात दि. १७ मे, २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकानूसार ज्या शिक्षकांना चौथ्या टप्प्यात पंसतीक्रमानूसार एकही शाळा मिळालेली नाही, अशा शिक्षकांना पुन्हा एकदा २० शाळांचा पंसतीक्रम देण्याबाबत पाचव्या टप्प्यात संधी दिलेली होती. तसेच या पाचव्या टप्प्यातही ज्यांची बदली झालेली नाही, त्यांची रॅण्डमायझेशन राउंड मध्ये बदली करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्याऐवजी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

i. टप्पा क्र. ५ व रॅण्डमायझेशन राउंड या दोन्ही संगणकीय प्रणालीवरील बदली पध्दती आता रद्द करण्यात येत आहे.

ii. टप्पा क्र. ५ व ६ ची कार्यपध्दती रद्द करण्यात आलेली असल्याने, आता या टप्प्यातील शिक्षकांच्या बदल्या खालील पध्दतीने समुदेशनाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कराव्यात.

iii. या करिता संगणकीय प्रणालीद्वारे चौथ्या टप्प्यानंतर अंतिमत: रिक्त राहिलेल्या जागा यादी " अ " म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच संगणकीय प्रणालीव्दारे चौथ्या टप्प्यात पदस्थापना न मिळालेल्या पण मूळ ठिकाणाहून बदली झालेल्या शिक्षकांची नांवे यादी " ब " म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल.

iv. सन २०१८ मध्ये कोकण विभाग वगळून ज्या बदल्या करण्यात आल्या होत्या व सन २०१९ मध्ये कोकण विभागातील ज्या जिल्हा परिषदांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या त्या बदली प्रक्रियेतील टप्पा क्र. ५ व टप्पा क्र. ६ (रॅण्डमायझेशन) द्वारे ज्या शिक्षकांच्या बदल्या झालेल्या

आहेत, त्या शिक्षकांना बदली हवी असल्यास संबंधित शिक्षकांनी त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करावा. अशाप्रकारे संबंधीत शिक्षकांचा अर्ज प्राप्त झाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी हे सदर शिक्षकाचा यादी " ब " मध्ये बदलीसाठी समावेश करतील व त्यांचे सध्याचे नियुक्तीचे ठिकाण रिक्त जागांच्या यादी " अ " मध्ये समाविष्ट करतील.

v. तसेच खालीलप्रमाणे यादी "अ " मधले शाळेचे व यादी " ब " मधले शिक्षकांची नांवे समाविष्ट करण्यात येतील व त्यांच्या पदस्थापनेच्या शाळेचे नांव यादी "अ " मध्ये समाविष्ठ करण्यात येईल.

१. न्यायालयीन आदेशानुसार विचार करावयाच्या शिक्षकांची नावे यादी "अ " मध्ये समाविष्ट करण्यात येईल.

२. सध्याची संगणकीय बदली प्रक्रीयेपूर्वी एकत्रीत (३० कि.मी च्या आत) असलेले पती पत्नी, पण संगणकीय प्रणालीव्दारा ३० कि.मी पेक्षा जास्त अंतरावर पदस्थापना मिळालेले शिक्षकापैकी, जर संगणकीय प्रणालीव्दारे पती पत्नी दोघांना बदली मिळाली असल्यास दोघांपैकी एकाने, तसेच पती पत्नी दोघांपैकी एकाची बदली झाली असल्यास ज्याची बदली झालेली नाही, अशानेच बदलीसाठी अर्ज करावा. अशाप्रकारे अर्ज केलेल्या शिक्षकांची नावे समाविष्ट करण्यात यावी व त्यांची मूळ पदस्थापनेची शाळा यादी " अ " मध्ये समाविष्ट करावी.

३. आंतरजिल्हा बदलीने रुजू झालेल्या शिक्षकांची नावे.

vi. यादी " ब ” मधील ज्या शिक्षकांचा बदलीसाठी **<u>प्राधान्याने</u>** विचार करण्यास न्यायालयाचे आदेश असतील अशा शिक्षकांना प्रथम प्राधान्याने समुपदेशनाने सेवाजेष्ठतेने पदस्थापना देण्यात येईल.

vii. त्यानंतर यादी " ब " मधील महिलांची नांवे संकलीत करुन सेवाजेष्ठतेनुसार यादी " क " तयार करावी व समुपदेशनाने या यादीतील महिला शिक्षकांची सेवाजेष्ठतेने पदस्थापना देण्यात

यावी.

viii. वरीलप्रमाणे यादी " क" यादीतील महिला शिक्षिकांची समुपदेशनाने बदली केल्यानंतर यादी " ब " मधील पुरुषांची नांवे संकलीत करुन सेवाजेष्ठतेनुसार यादी " ड " तयार करावी व समुपदेशनाने बदली देतांना या यादीतील पुरुष शिक्षकांना सेवाजेष्ठतेने पदस्थापना देण्यात यावी.

ix.उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करताना रिक्त जागांमध्ये अनिवार्य रिक्त जागांचा समावेश असणार नाही याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी स्वत: करावी कारण समानीकरणाचे धोरण हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी आवश्यक आहे. या धोरणाचे उल्लंघन केल्यास संबधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.

५) संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयात दि. १५.४.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकानूसार बदल्यांबाबतच्या अनियमिततेबाबतची तक्रार संबंधित शिक्षकांना विभागीय आयुक्तांच्याकडे करण्याची मुभा दिलेली होती. त्यामुळे प्रशासकिय कामकाज सुलभ व गतिमान पध्दतीने होण्यासाठी खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

I) संगणकीय प्रणालीद्वारे निर्गमित झालेल्या बदली आदेशाच्या विरोधात बदलीच्या अनियमिततेबाबत तक्रार असल्यास त्याचा निपटारा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर झाल्यास संबंधित शिक्षकाला जिल्हा परिषद स्तरावरच सत्वर न्याय मिळू शकतो. यासाठी जिल्हांतर्गत बदलीमध्ये शिक्षकांची तक्रार असल्यास सदरच्या तक्रारीची चौकशी करुन निवारण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर एक समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचा समावेश असेल. बदलीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित शिक्षकांनी ७ दिवसांच्या आत बदलीबाबत तक्रार असल्यास या

समितीकडे तक्रार अर्ज दाखल करावा. तक्रारीच्या संबंधात समितीने चौकशी करुन ३० दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. परंतु बदलीबाबतची तक्रार तपासत असताना, गैरसोयीची नियुक्ती म्हणजे बदल्यांमधील अनियमितता नव्हे, असे प्रामुख्याने स्पष्ट करण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत घोषित करण्यात आलेल्या अनिवार्य रिक्त जागेवर शिक्षकांची समुपदेशनाने नियुक्ती करता येणार नाही कारण समानीकरणाचे धोरण हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी आवश्यक आहे.

ii) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास संबंधित शिक्षक बदलीच्या अनियमिततेबाबत विभागीय आयुक्तांच्याकडे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत दाद मागू शकतात. अशा पध्दतीने विभागीय आयुक्तांच्याकडे दाखल झालेल्या अपिल वजा तक्रारीवर शक्यतो तक्रार प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसांच्या आत विभागीय आयुक्तांनी निर्णय घ्यावयाचा आहे. विभागीय आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

iii) वरीलप्रमाणे बदलीच्या आदेशाचे विरुध्द अपीलीय प्रक्रिया सुरु असतांना जर शैक्षणिक वर्ष आरंभ झाले तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून अपीलीय प्रक्रियेला बाधा न येता व शिक्षकांचे अपिलीय अधिकार अबाधीत ठेवून शिक्षकांना त्यांना नेमून दिलेल्या पदस्थापनेवर हजर होऊन शैक्षणिक कर्तव्य बजावणे बंधनकारक राहील.

६) सदर बदली प्रक्रियेचे प्रथम चार टप्पे संगणकीय आज्ञावलीद्वारे होत असून, एकाचवेळी कार्यान्वित होतील व या चार टप्प्यांचे आदेशही एकाचवेळी निर्गमित होतील. या आदेशानंतर उर्वरीत शिक्षकांच्या बदलीचे आदेश वरील नमूद समुपदेशन पध्दती अवलंबून निर्गमित होतील.

सदर शासन पुरकपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201905281102354020 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ravindra Ishwar Giri
Date: 2019.05.28 16:28:56 +05'30'

(र. ई. गिरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२